# महात्मा फूले यांच्या व्यक्तिमत्वाची जडण घडण 'महात्मा' या कादंबरीच्या आधारे

**हरिहर मनिषा शिवाजी,** संशोधक विद्यार्थीनी, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

..........................................................................................

**प्रस्तावना**: मराठी साहित्याचा अभ्यास विविध अंगाने झालेला दिसून येतो त्या त्या कालखंडानूसार साहित्य लेखन झालेले पहावयास मिळते. मध्ययूगात भावरूप भक्ती प्रणवता या स्वरूपात उदयाला आलेले साहित्यप्रवाहाने इंग्रजी कालखंडात त्या साहित्याने वैचारिक रूप धारण केले. वैचारिक साहित्य हे विचाराला चालना देणारे ठरते. नविन विचार समाजात रूजवण्याचे कार्य वैचारिक साहित्य करत असते.

समाजाचा वैचारिक विकास व्हावा याच हेतूने म.फूले यांनी आपले संपूर्ण जीवन समाजासाठी वाहिले. क्रांतीकारी विचाराचा धागा पकडून रवींद्र ठाकूर यांनी 'महात्मा' ही कादंबरी लिहली.ही कादंबरी महात्मा फूले यांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश झोत टाकणरी आहे. त्यांनी आपल्या लेखनातून महात्मा फुले यांचे विचार समाजापूढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'महात्मा' ही व्यक्तीचरित्रात्मक व समाज सापेक्ष अशी कादंबरी आहे. ही कादंबरी माणसाच्या मनावर खोल परिणाम करते. वैचारिकदृष्या ही कादंबरी श्रेष्ठ ठरते. या कादंबरीत फुले यांचे संपूर्ण जीवन चरित्र उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. जोतिराव फुलेयांच्या जीवनाची सुरूवात बालपणा पासून केलेली नाही, परंतू मनुष्याच्या आयुष्याला कलाटणी देणारी अवस्था असते ती म्हणजे तारूण्याअवस्था. तिथूनच आपली विचार करण्याची क्षमता वाढत असते. म्हणून रवींद्र ठाकूर यांनी महात्मा फुलेयांच्या मनावर कोणत्या क्रांतीकारी विचाराचा प्रभाव पडलेला होता, इथूनच कादंबरीची सुरूवात केलेली आहे. समाजात ज्या चालत आलेल्या रूढी परंपरा यांना डावलून एक नवा विचार समाजापूढे मांडण्याचा प्रयत्न म. फुलेयांनी केला आहे. राज्यसत्ता शतकानुशतके ही धर्मसंस्थेच्या अधिपत्याखाली चालवली जात होती. त्या समाजातील प्रत्येक माणूस गूलाम झालेला पहावयास मिळतो प्रत्येकाला स्वतंत्र जीवन जगण्याचा हक्क आहे. माणसाला आपले हक्क मिळालेच पाहिजेत असा त्यांचा अट्टास होता. 'लोकसत्ता हीच खरी राज्यसत्ता' होवू शकते असा त्याचा ठाम विश्वास होता. सर्वांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे त्यासाठी ते सतत प्रयत्न करत होते.

वास्तविक पहता महान विचारवंताच्या क्रांतिकारक वैचारिक जडण—घडणीचा व सामाजिक कार्याचा आढावा रवींद्र ठाकूर यांनी 'महात्मा' या कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाने म. फुलेयांच्या बालपणापासून सुरूवात केलेली नाही. समाजात ज्या परंपरा चालत आलेल्या होत्या त्यांना न जूमानता आधुनिक विचारसरणी लोकापूढे मांडण्याचा प्रयत्न केला. त्या विरूध्द आवाज उठवण्यासाठी अगोदर सर्वांनी एकत्र आले पाहिजे, तरच आपला विकास होवू शकतो असे म. फुले म्हणतात.

**व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार—**

म.फुले यांनी मानवी हक्काबरोबर व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आपल्याला दिसून येतो. धर्माच्या नावाखाली लोकांना छळले जायचे, समाजात अन्याय करणाऱ्यांची संख्या वाढतच चाली होती. हे कुठतरी थांबल पाहिजे 'सर्व लोकात एकी झाल्याशिवाय इंग्रजांना हकलवून देता येणार नाही'. तेवढी ताकत फक्त एकटयात नसून आपल्या सर्वांच्या एकत्र येण्यानी वाढणार आहे. समाजात एकी नांदली पाहीजे राजकीय स्वातंत्र्य मिळाले तर सनातनी लोक पून्हा सत्ता बळकावून बसतील 'लोकसत्ता ही खऱ्या अर्थाने राज्यसत्ता होऊ शकते' तसे व्हायचे असेल तर आपल्यात एकी झाली पाहीजे. ते जेव्हा घडेल तेव्हाच देशात लोकांचे राज्य स्थापन होईल. अन्यथा सोशिक आणि आत्याचारिक करणाऱ्याची संख्या अशीच वाढत राहील. प्रत्येक व्यक्तिला स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार आहे. आणि तो त्याला मिळालाच पाहिजे.

**मानवताधर्म—**

म.फुले यांनी मानवता हा एकच धर्म आहे. मी कोणताही धर्म मानत नाही. सर्व जाती धर्मातील लोक हे माझ्यासाठी एकच आहेत. त्यांचे विचार कृतीशिलतेला गती देणरे आहेत. शिवाय समाज परिवर्तनाला पोषक ठरणारे आहेत. माणूस हाच श्रेष्ठ आहे, तो कोणत्या जातीचा, धर्माचा आहे. हे महत्वाच नसून त्याचे आचार—विचार आणि त्याची विवेकदृष्टी यावर समाजाची उन्नती होत असते. धर्माविषयी समाजात चूकीच्या समजूती रूढ होत चालेल्या आहेत. आणि त्याला समाज भूलतचालला आहे. हे कुठतरी थांबलच पाहिजे असे म.फुले यांना वाटत होते. यासाठी त्यांनी धर्म म्हणजे नेमक काय हे लोकांना पटवून सांगितले. धर्माच्या नावाखाली माणसाला अतिशय पशूतूल्य, हीनतेची वागणूक दिली जात असे. ईश्वरनिष्ठ आणि धर्मनिष्ठ हाच मानवी जीवनाचा मूलाधार आहे, या चूकीच्या विचारांची जळमट दूर केल्याशिवाय नविन विचारांची देवाण—घेवाण होणार नाही. यासाठी माणसांनी शिकले पाहिजे. म.फुलेयांनी स्वत: अगोदर आपल्या पत्नीला साक्षर केले. शिक्षणाची सुरूवात आपल्या घरापासून अगोदर केली.

**विधवांचा मूक आक्रोश—**

विधवा स्त्रियांच्या वाटयाला आलेल्या वैधव्यामूळे स्त्रीयांना समाजात मानाचे स्थान दिले जायचे नाही. त्यांना हिनतेची वागणूक दिली जायची, याचे यर्थात चित्रण 'महात्मा' या कादंबरीत रवींद्र ठाकूर यांनी मांडले आहे. हिंदूधर्मात रूढी परंपरांना खूप मानले जायचे. त्याचा त्रास ज्या परंपराना बळी पडलेल्या लोकांना होत होता. पण त्या विरूध्द आवाज उठवण्याचे धाडस कोणाच्यात नव्हते. होणारा अन्याय ते सहन करत असत हिंदू धर्मात विधवांना अपवित्र माणले जायचे, त्यांचा शारीरिक छळ केला जात असे. त्यांना स्वत:च असं अस्तित्व नसायचे नेहमी दुसऱ्याच्या दबाखाली जगत असतं. त्यांचा हा मूक आक्रोश म. फूले व सावित्रीबाई फूले यांना जाणला म्हणून त्यांनी विधवांना या जाचातून बाहेर काढण्यासाठी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. पूर्वी बालविवाह पध्दत रूढ असल्यामूळे न कळत्या वयातच त्यांना बोहल्यावर चढवलं जायचं आणि कालांतराने त्याच चिमरूडयांना वैधव्य आलं की समाज त्यांना वाळीत

टाकत असतं. त्यांचा छळ केला जायचा समाज असणारे क्रुर प्रवृत्तीचे लोक अशा विधवांचा फायदा होत वासणेच्या पोटी त्यांच्यावर शारीरिक छळ केला जायचा, त्यातून त्यांना अपत्य प्राप्ती झाली की आत्महत्या, भ्रुणहत्या असे गुन्हे घडत त्यातूनही त्या वाचल्या की समाजापासून दूर कुठे तरी निघून जात. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी काही कामधंदा मिळत नसे म्हणून याच स्त्रीया वैश्या व्यवसायाकडे ही वळलेल्या पहावयाला मिळतात. हे कुठतरी थांबल पाहिजे, विधवावर होणारा अन्याय कुठतरी थांबला पाहिजे. यासाठी म.फुले यांनी व सावित्रीबाई फूले यांनी विधवांना आपल्या परिने प्रयत्न केले. मानसिक आधार द्यायच्या. शारीरिक छळाला बळी पडून गरोदर राहिलेल्या विधवाना सावित्री सुरक्षित जागी कुणालाही न समजता त्यांचे बाळतंपण करायच्या. समाज काय म्हणेल? या भीतीने त्या आपले आयुष्य संपवायच्या समाजात पतिनिधनानंतर अनेक प्रथांना या स्त्रीया बळी पडायच्या त्यांचे केशवपन करून त्यांना घरकोंबडी बनवले जायचे. म.फुले म्हणतात, 'याच न्यायाने पत्नी मेल्यानंतर पतीने दाडी मिश्या काडून अरण्यात का राहत नाही. पुरूषानी अनेक बायका करायच्या आणि स्त्रीयांनी मात्र अन्याय सहन करत जीवन जगायचं हा कोणता न्याय?' बुवाबाजी मध्ये स्त्रीयांना नादी लावणारे पुरूषच असतात परंतु स्त्रीयांनाच जबाबदार समजले जात असे. यासाठी फुले यांनी विधवा पूनर्विवाह व्हावेत यासाठी प्रयत्न केले.

**शेतकऱ्यांची वाताहत—**

रवींद्र ठाकूर यांनी 'महात्मा' कादंबरीत समाजातील रूढी परंपराबरोबर समाजाचा मुख्य स्त्रोत शेती हा असल्यामूळे शेतकऱ्याच्या दु:खाची कारूण्य अवस्था या कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तळागाळातील शेतकरी हा पैशाअभावी सावकारांच्या अवैध्य कर्जाला बळी पडतात. सावकार हा श्रीमंत असल्यामूळे गरीब शेतकऱ्याचे अतोनात हाल करत आहे. दुष्काळाच्या वेळी शेतकऱ्यांना पैशाची गरज असते, तेव्हा हेच सावकार दिलेल्या पैशावर दुपटीने व्याज आकारत असतात. पैशाच्या मोबदल्यात त्यांच्या जमिनी, घर हे आपल्या नावावर करून घेत असत.आणि वेळेवर पैसे परत नाही दिले की तारण ठेवलेली वस्तू स्वत:च्या मालकीची करून घेत असत. असा हा वर्षानुवर्ष कारभार चालेला असे. त्यांचा हा अन्याय शेतकरी सहन करत असत. वेळ पडली तर आत्महत्या करत.

रवींद्र ठाकूर यांनी 'महात्मा' या कादंबरीत समाजात चालणाऱ्या रूढी परंपरा यांना अशिक्षीत लोक कसे बळी पडतात याचे वास्तव चित्रण केले आहे. समाजातील गरीब हा गरीबच राहिला आहे आणि श्रीमंत श्रीमंतच होत चालला आहे. प्रचलित असणाऱ्या अनेक रूढी परंपरावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न म.फुले यांनी केलेला आहे. समाजाला अन्याय अत्याचाराच्या विळख्यातून कसे बाहेर काढता येईल या साठी केलेले प्रामाणिक प्रयत्न रवींद्र ठाकूर यांनी 'महात्मा' या कादंबरीत मांडलेले आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

१ ठाकूर , रवींद्र — 'महात्मा' मेहता पब्लिशिंग हाऊस, पूणे प्रकाशन ऑक्टो १९९९,२००४ पूनर्मुद्रण डिसेंबर २००९
२ मर्ढेकर,बा.सी—'सौदर्य आणि साहित्य' मुंबई प्रकाशन. १९७५
३ शिंदे, ताराबाई— 'स्त्रीपुरूष तुलना' प्रतिमा, प्रकाशन, पूणे. १९९७
४ पवार, महेंद्र — दै. देशोन्नती वृत्तपत्र , दहिवर
५ बदामे, तातोबा— तरूण भारत वृत्तपत्र, परीक्षणफुले